महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने पुरस्कार दिलेल्या

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे

इतिहास संशोधन मंडळ

स्थापना २४ जून १९५८

# भारतीय इतिहास आणिं संस्कृति

## त्रैमासिक

(वर्ष : ५४) एप्रिल - जून २०१७ (पुस्तक : २१३)

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका

१. राजमाता जिजाऊ काल आणि कर्तृत्व - डॉ. विनोद बाबुराव बोरसे — १
२. राजा नेमाजी शिंदे - डॉ. प्रभाकर गद्रे - — ५
३. खानदेशातील टपाल व्यवस्थेचा इतिहास - श्री. दिपक बाबुलाल शिरसाट — १६
४. भुलेश्वर मंदिराजवळील चतुष्की : एक अभ्यास - कु. गौरी काटे — २१
५. महाराष्ट्रातील परित्यक्तांच्या समस्या - नाशिक संदर्भातील एक अभ्यास - डॉ. सरल धारणकर — २६
६. कोकण गांधी अप्पासाहेब पटवर्धन यांचे सामाजिक कार्य - डॉ. आर. एच. कांबळे — ३८
७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मंदिर प्रवेशाची चळवळ : १९२७ - १९२९ - डॉ. यु. एस. सावंत — ४४
८. कोकण इतिहास परिषदेच्या सातव्या अधिवेशनाचा वृत्तांत - २०१७ - श्री. सदाशिव टेटविलकर — ४८
९. ग्रंथ परीक्षण -१. कर्तृत्वशालिनी महाराणी हिराई परिक्षक: डॉ. प्र. सा. खोबरेकर — ५०
२. देवगिरी उर्फ दौलताबादच्या किल्ल्यातील टांकसाळ परिक्षक: प्रा. डॉ. एस्. डी. खैरनार
१०. मंडळवृत्त - डॉ. प्र.सा. खोबरेकर — ५३

लेखांतील मताशी इतिहास संशोधन मंडळ सहमत असेलच असे नाही.
तसेच शोधनिबंधाची जबाबदारी स्वत: लेखकावर राहिल.

या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाकडून अनुदान मिळाले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकांतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्यशासन सहमत असेलच असे नाही.

(वर्ष : ५४) एप्रिल - जून २०१७ (पुस्तक :२१३)

Scanned by CamScanner

# ३. खानदेशातील टपाल व्यवस्थेचा इतिहास

लेखक : दिपक बाबुलाल शिरसाट
भ्रमणध्वनी : १७६७३६१६३७

इ.स.१७५२ साली भालकीच्या तहाने खानदेश मराठ्यांच्या ताब्यात आला. दख्खनमधील सहा सुभ्यापैकी तो एक महत्त्वाचा व समृद्ध सुभा होता. खानदेशावर फारूकी व मोघल प्रशासनाचा प्रभाव होता. मराठा साम्राज्याच्या हाती खानदेश सुभा आल्यानंतर राजकारभारातील प्रशासन व्यवस्थित चालविण्यासाठी पेशव्यांनी अनेक सुधारणा केल्या. त्यापैकी डाक व्यवस्था होय. या पद्धतीला टप्पा, पेड, जासुद पद्धती आणि डाक अशी विविध नांवे होती. जासूद हा शब्द मुळ जासुस असून तो अरेबीक शब्द आहे. त्याचा अर्थ बातमी आणणारा असा होतो.[१] मध्ययुगीन कालखंडात डाक चौकी व्यवस्था प्रसंगापुर्ती काही काळ चालु राहत असे. युद्ध चालु-असतांना मराठा सरदार डाक चौकी बसवित. खानदेशात महादजी शिंद्यांनी लष्करापासुन ते बुऱ्हाणपुर पर्यंत डाक चौकी बसविली होती.[२] टपालाच्या संदर्भात प्रामुख्याने गांव टपाल, सावकारी टपाल आणि सरकारी टपाल असे तीन प्रकार असत. होळकरांनी महेश्वर ते पुणे डाक व्यवस्था सुरू केली होती.[३]

गावचे टपाल म्हणजे कागदपत्रे, निरोप किंवा सांगावा पोहचविण्याचे काम गावातील महार लोकांमार्फत होत असे. सावकार लोक हे केवळ पैशाचीच उलाढाल करीत नसत तर त्यांचे व्यापारी व सराफी धंदेही मोठ्या प्रमाणात चालत असत. हुंड्या, वराता, चिठ्ठ्या, पत्रे यांची वाहतूक करण्यासाठी त्यांना टपाल वाहतूकीची व्यवस्था केली जाई. अशा टपालास सावकारी टपाल म्हणत. अशा सावकारी टपाल यंत्रणेमार्फत खाजगी लोकांच्या टपालांचीही नेआण करण्यात येत होती. पेशवे काळात सावकारी टपालास खूप महत्त्व प्राप्त झाले होते.

खानदेशात बुऱ्हाणपूर ते पुणे येथे नियमीत टपाल व्यवस्था सुरू होती.[४] एवढेच नव्हे तर होळकरांनी महेश्वर पासून थाळनेर पर्यंत ४० कोस अंतरावर नियमित डाक व्यवस्थेचा प्रारंभ केला होता.[५]

जासूद पद्धतीचे काशीद, जासूद, हरकारा, राऊत, सांडणीस्वार, प्यादा, जिलीब, रसानगीदार, खासबारदार, ढालईत, फडनाईक खिजमतगार इ.प्रकार होते.[६] खानदेशात भाड्याने टपाल वाहून नेण्यासाठी, त्याकाळी जयेदार असत. त्यांच्याकडे डाक वाहून नेण्याची सोय असे. परगणा सुलतानपुर मध्ये इ.स. १७८३ -८४ साली भवानी नाईक व धनाजी हे दोघे जयेदार होते.[७] खत, चिठ्ठी, कागद, पत्र हे थैलीतून पाठविले जाई. लखोटा म्हणजे लखोटा नाममुद्रित असे. ज्या पत्राच्या वेष्टनावर मुद्रा करून ते वेष्टन बंद केले जाई ते याच थैलीतून पाठविले जाई. परगणे शेंदुर्णीच्या ताळेबंदात घोपट्या तयार करून घेतल्याचे दिसते. टपाल टप्प्याटप्याने पोहचविले जाई. पहिला जासूद विशिष्ट टप्प्यावर गेला की, दुसरा तयार असे. पहिला जासूद आपल्याजवळील थैली पुढच्याच्या हातात त्वरीत देत असे. एक टप्पा साधारणत: ५ कोसांचा असे. अहिल्याबाई होळकरांनी ज्यावेळी महेश्वर ते पुण्यापर्यंत डाक - व्यवस्था सुरु केली. तेव्हा हा टप्पा १० कोसांचा होता.[८] ही व्यवस्था पुर्णपणे खानदेशातून जात होती. पुणे ते महेश्वर दरम्यान थाळनेर-चांदवड-संगमनेर मार्गे असा त्याचाप्रवास होता. महेश्वरहून पुण्याला ८ दिवसात पत्र पोहचत असे.

जलद डाक व्यवस्था देखील अस्तित्वात होती. एक काशीद प्रत्येक तासाला साधारणत: ३ ते ४ कोस पायी चालत असे. दररोज १३ ते १४ कोस एवढे अंतर होत असे. नानासाहेब पेशवा थाळनेरला असताना तेथून त्याला दिल्लीत आपल्या वकिलाला त्वरित पत्र पाठवायचे होते (इ.स. १७५३ - ५४) म्हणून त्यांनी कासिदला सांगितले की, हे पत्र जर, आपण दिल्ली येथे बापूजी महादेव यांना सोळाव्या दिवशी पोहचवले तर ५० रूपये, १७ व्या दिवशी पोहचवले तर ४० रूपये, १८ व्या दिवशी पोहचविले तर ३० रूपये व १९ व्या दिवशी पोहचविले तर आपणास काहीच मिळणार नाही.[९] यावरून असे दिसते की, खानदेशातून दिल्लीला डाकद्वारे पत्रव्यवहार होत होता. खानदेशातून दिल्लीला प्रशासकीय संबंध जोपासले जात होते. खानदेशातून निघालेले डाक हे कमीत कमी १६ दिवसात जास्तीत जास्त १८ व्या दिवशी पोहचत असे. खानदेशातील डाक व्यवस्था ही अतिशय जलद होती. काही वेळेस डाक व्यवस्थेत अडथळा अडचणी येत असत. इ.स. १७६८ मध्ये तुकोजी होळकर यांचेकडून येणारे दोन जासूद लूटले गेले. तेव्हा पेशव्यांनी त्यांना नुकसान भरपाई म्हणून ८ रूपये दिले होते.[१०] वरील माहिती वरून पेशवेकाळात डाक व्यवस्था ही महत्वाची होती असे दिसते.



Scanned by CamScanner

मराठेशाहीच्या अंतापूर्वी खानदेशचा बहुतांश भाग इंदोरच्या होळकरांकडे होता. इंग्रज जबर होत असल्याचे दिसताच मराठ्यांनी एकी करण्याचा प्रयत्न केला. परंतु शेवटी अपयश आले. होळकर व दोस्तांच्या फौजांनी सर जॉन माल्कम व सर थॉमस हिस्लॉप यांच्या सेनेशी लढाई २१ डिसेंबर १८१७ रोजी झाली. या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. या लढ्यानुसार होळकरांनी सातपूड्याच्या दक्षिणेकडील आपला मुलूख आपणास देण्याची अट घातली. तहानुसार खानदेशचा संपूर्ण भाग इंग्रजाकडे सुपूर्द करण्याचे होळकरांनी मान्य केले. नंतर इंग्रजांची सत्ता खानदेशावर आली.

इंग्रजांनी आपली सत्ता टिकवण्यासाठी व राज्यकारभारातील हालचाली जलद होण्यासाठी दळणवळण व्यवस्था सुधारली. डाक व्यवस्था ही त्यापैकी होती. १८८० मध्ये धुळे येथे बटवडा कार्यालय असलेला खानदेश डाक विभाग होता. त्यात ५३ डाकघरे होती. पूर्व भागात उपपोस्टमास्तर होता. त्याच्या ताब्यात भुसावळ, जळगांव, पाचोरा टपाल कार्यालये होती.[११] इतर उपविभागात सहाय्यक उप पोस्टमास्तरची नियुक्ती केली होती. त्याच्या देखरेखीखाली अमळनेर, भडगांव, बोदवड, जामनेर, महिजी, चाळीसगांव, चोपडा, धरणगांव एदलाबाद, एरंडोल, नशिराबाद, पारोळा, सावदा, वरणगांव आणि यावल ही उपडाक कार्यालये होती. फैजपूर, म्हसावद नेरी, निंभोरा पातोंडा व रावेरला शाखा डाक कार्यालये होती.

आडावद आसोदे, कजगांव, कानळद, नगरदेवळा, नांद्रा, पाळधी, पिंपराळे, शेंदुर्णी येथील शाखा डाक कार्यालये खेड्यातील शाळा मास्तरांद्वारे चालविण्यात येत.[१२] माहेजीला डिसेंबर ते फेब्रुवारी जत्रेच्या कालावधीत डाकघर उघडण्यात येई. चाळीसगांवच्या आग्नेयकडील २० मैलावरील निजामाच्या अधिपत्याखालील कन्नड टपाल कार्यालयाचा खानदेश डाक विभागात समावेश होता.[१३]

सर्व डाकघर कार्यालयावर डाकघर निरीक्षक देखरेख करीत असे. त्याच्या मदतीला उपनिरीक्षक असे काही प्रमुख डाकघरांवर बटवड्याच्या व्यवस्थेसाठी ३२ पोस्टमनची नेमणूक करण्यात आली होती. काही ठिकाणी पोस्टमनचे काम हरकाराकडून करून घेण्यात येई. खेड्यातील बटवड्याचे काम ठेकेदारांकडून घोडा गाडीतून करण्यात येई. ईशान्य भागातील पत्रांच्या पिशव्या ग्रेट इंडियन पेनिन्सूला रेल्वेद्वारा नेत असत. भुसावळ रेल्वे स्थानकावर पृथक्करण कार्यालये होती.



इ.स. १९४७ मध्ये पूर्व व पश्चिम खानदेश डाक विभागाचे कार्यालय जळगांवला आणले. इ.स. १९६० मध्ये या विभागाचे विभाजन होऊन धुळे जिल्ह्यासाठी स्वतंत्र डाक विभाग अस्तित्वात आला. जळगांवमधील मुख्य डाक कार्यालये जळगांवला आस्तित्वात आली तर उपडाक कार्यालये तालूका ठिकाणी अस्तित्वात आली. १९६१-६२ मध्ये जिल्ह्यात ३६ उप डाक कार्यालये, २९८ शाखा डाक कार्यालये होती. १९५१-५२ मध्ये डाक पिशव्यांची संख्या १६ होती. तर १९६१-६२ मध्ये १३४ पर्यंत वाढली. जळगांवमध्ये १८ तालुके असून प्रत्येक तालुक्यांच्या ठिकाणी एक उप पोस्ट कार्यालय आहे. जिल्ह्यात एकुण ५४५ पोस्ट ऑफिस मुख्य डाकघर आहे.[१४] भुसावळचे मुख्य डाक कार्यालय १ जानेवारी १९७६ रोजी अस्तित्वात आले सन १९८० मध्ये जळगांव डाक विभागाचे विभाजन करून जळगांव व भुसावळ असे दोन स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आले. जळगांव विभागात १९७६ मध्ये दोन मुख्य डाक कार्यालये, ४५ उप डाक कार्यालये, १४ अतिरिक्त उप डाक कार्यालये आणि २५६ शाखा कार्यालये होती. त्यापैकी ११० कार्यालयातील तार सेवा आणि सार्वजनिक दूरध्वनी सेवा उपलब्ध असून १०८ ठिकाणी रात्रसेवा व फिरती पोस्ट कार्यालये होती.

सन १९८५ मध्ये भुसावळ डाक विभागाच्या अधिकाराखाली १७६ टपाल कार्यालये होती. या कार्यालयांमधे ६४ पोस्टमन, ५३९ पत्रपेट्या ५, ५७, ५६ येणारी दैनिकपत्रे आणि १, ६५, १०४ जाणांरी दैनिकपत्रे होती. याशिवाय बाहेरून येणाऱ्या पार्सल पुडक्यांची संख्या ३०,८५ आणि व्ही.पी. पार्सल संख्या १६५ होती.

**निष्कर्ष :**

खानदेशात पेशव्यानी डाक व्यवस्था विकसीत केली होती. साधनांचा दळणवळणाचा अभाव असून सुद्धा देशाच्या कानाकोपऱ्यात पत्रव्यवहार होत असे. पेशव्यांच्या अस्तानंतर इंग्रजांनी धुळे, जळगांव, भुसावळ येथे टपाल व्यवस्था सुरळीतपणे सुरु केली. पेशव्यांनी राज्यकारभारात सुधारणा करण्यासाठी टपाल व्यवस्थेत बदल केला तर ब्रिटीश काळात इंग्रजांनी खानदेशातील व्यापार, राज्यकारभार, सुरळीत चालविण्यासाठी जलद डाक व्यवस्था निर्माण केली.

❋ ❋ ❋

Scanned by CamScanner

## संदर्भ व टिपा

१. शहा जी.बी., मध्ययुगीन खानदेश, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, प्रथमावृत्ती २०१५, पृ.क्र.२६५.

२. कित्ता.

३. वाघमोडे शिवाजी मारोती, पेशवेकालीन टपाल व्यवस्था महेश्वर ते पुणे टपाल व्यवस्थेच्या विशे संदर्भात मध्ययुगीन विभाग, अ.मा.इ.परिषद २३ वे राष्ट्रीय अधिवेशन, इंदापूर, २०१४ पृ.क्र.१८२.

४. शहा जी.बी.,पुर्वोक्त, पृ.क्र. २६८.

५. वाघमोडे शिवाजी, ,पुर्वोक्त, पृ.क्र. १८४.

६. शहा जी.बी.,पुर्वोक्त, पृ.क्र. २६८.

७. कित्ता, पृ.क्र. २६९.

८. कित्ता, पृ.क्र. २७०.

९. कित्ता, पृ.क्र. २७१.

१०. चौधरी कि.का., महाराष्ट्र राज्य जळगांव जिल्हा गॅझेटिअर दर्शनिका विभाग, मुंबई, महाराष्ट्र, शासन, मराठी आवृत्ती १९९४, पृ.क्र. ५१३.

११. कित्ता.

१२. कित्ता.

१३. कित्ता.

१४.www. jalgaon post office.google.com १.११.२०१६.

१५.चौधरी कि.का., पुर्वोक्त, पृ.क्र.५१४.

कै. सौ. सखुबाई रामचंद्र भोसले, मु. बामणी, ता. सांगोला, जि. सोलापूर यांच्या दि. २७ मार्च २०१७ रोजीच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त रु. एक हजार मात्र 'भारतीय इतिहास आणि संस्कृती' या त्रैमासिकास डॉ. नारायण भोसले, मुंबई यांचेकडून देणगी.

Scanned by CamScanner